# महाराष्ट्र शासन
# कोतवाल भरती परीक्षा - 2023

जिल्हा - उस्मानाबाद

परीक्षा दिनांक 30 जुलै, 2023 वेळ:- स. 11.00 ते दु. 12.00

एकूण – 50 प्रश्न गुण- 100

1) उस्मानाबाद जिल्ह्याचे हवामान कोणत्या प्रकारचे आहे ?

(A) उष्ण (B) कोरडे (C) उष्ण व कोरडे (D) समशितोष्ण

2) ......... येथे बौध्द कालीन स्तुप आहे.

(A) तेर (B) उस्मानाबाद (C) येडशी (D) सास्तूर

3) बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांच्या सीमा कोणत्या नदीने स्पष्ट केल्या आहेत ?

(A) सीना (B) तेरणा (C) मांजरा (D) बोरी

4) 2011 च्या जनगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्याची लोकसंख्या किती ?

(A) 14,57,571 (B) 15,57,571 (C) 16,57,571 (D) 17,51,571

5) उस्मानाबाद जिल्ह्यातील लोहमार्ग कोणत्या तालुक्यातून गेला आहे ?

(A) भूम (B) वाशी (C) कळंब (D) उस्मानाबाद

6) उमरगा तालुक्यात हातमागाचा व्यवसाय कोठे चालतो ?

(A) कसगी (B) डाळींब (C) सास्तूर (D) मुरुम

7) 2011 च्या जणगणनेनुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्वात कमी लोकसंख्या असलेला तालुका कोणता ?

(A) लोहारा (B) भूम (C) परंडा (D) वाशी

8) जिल्ह्यातील महसूल उपविभाग कोठे नाही ?

(A) भूम (B) कळंब (C) उमरगा (D) वाशी

9) उस्मानाबाद जिल्ह्यात क्षेत्रफळानुसार सर्वात मोठा तालुका कोणता ?

(A) उस्मानाबाद (B) तुळजापूर (C) उमरगा (D) कळंब

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner

10) उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन केव्हा झाले ?

(A) 15 ऑगस्ट, 1982 (B) 15 ऑगस्ट, 1981

(C) 16 ऑगस्ट, 1982 (D) 16 ऑगस्ट, 1981

11) आमचे प्रफुल्ल कुलकर्णी सर सेवा निवृत्त झाले तेंव्हा शुभेच्छा देण्यांचा कार्यक्रम होता त्यावेळी सर्वांचा <u>कंठ दाटून आला होता.</u> या वाक्यातील अधोरेखित अर्थाचा वाक्प्रचार सांगा ?

(A) अचानक बळ येणे (B) कपाळाला हात लावणे (C) गहिवरुन येणे

(D) मोठ्याने रडणे

12) एखाद्या वाक्यात नामाबद्दल विशेष माहिती सांगण्यासाठी काय वापरतात ?

(A) क्रियापद (B) विशेषण (C) सर्वनाम (D) यापैकी नाही

13) एकाक्षरी शब्द नेहमीच .......... असतात. रिकाम्या जागी पर्यायातील योग्य शब्द निवडा.

(A) दीर्घ (B) -हस्व (C) स्वर (D) व्यंजन

14) गरीबीतून मोलमजूरी करुन सीताराम एक दिवस जिल्हाधिकारी झाला म्हणतात ना...........

(A) तहान लागल्यावर विहीर खणणे (B) पदरी पडले पवित्र झाले

(C) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही. (D) सत्तेपुढे शहाणपण नाही

15) खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

कविता राऊतने धावण्यात <u>सुवर्णपदक</u> मिळविले.

(A) नाम (B) सर्वनाम (C) विशेषण (D) क्रियापद

16) "काका, तुम्हीही बसा आमच्याजवळ." या वाक्यातील क्रियापद ओळखा.

(A) तुम्हीही (B) काका (C) बसा (D) आमच्याजवळ

17) मी <u>जळवा</u> पाहील्या. या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे एकवचन कोणते ?

(A) जळ (B) जळव (C) जळू (D) जळी

18) दिलेल्या क्रियापदाचा काळ ओळखा.

तो हसला.

(A) वर्तमानकाळ (B) भूतकाळ (C) भविष्यकाळ (D) साधाकाळ

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner

19) मी शारिरीक शिक्षणाच्या तासाला उपस्थित होतो. या वाक्यातील अशुध्द शब्द ओळखा.

(A) शारिरीक (B) शिक्षणाच्या (C) उपस्थित (D) होतो

20) सौरभ ज्याठिकाणी गेला होता तेथील परिस्थिती लक्षात घेऊन वर्तन करत होता. या वाक्यातील अर्थाची म्हण पर्यायातून निवडा.

(A) दाम करी काम (B) गर्वाचे घर खाली (C) नवी विटी नवे राज्य (D) देश तसा वेश

21) खाली दिलेल्या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द कोणता ?

राजमार्ग

(A) महामार्ग (B) आडमार्ग (C) अराजमार्ग (D) छोटा मार्ग

22) 'मुर्खपणाचा सल्ला देणारा' या अर्थाचा अलंकारिक शब्द खालीलपैकी कोणता ?

(A) उंटावरचा शहाणा (B) बोकेसंन्यासी (C) पांढरा परीस (D) अकलेचा कांदा

23) खालीलपैकी अयोग्य जोडी कोणती ?

(A) अरण्याचा राजा - वनराज (B) नाटक लिहिणारा - नट

(C) उपकाराची जाण ठेवणारा - कृतज्ञ (D) एकटा राहणारा - एकलकोंडा

24) गीता म्हणाली मी अभ्यास करणार आहे

हे वाक्य व्याकरणदृष्ट्या योग्य होण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

(A) गीता म्हणाली "मी अभ्यास करणार आहे."

(B) गीता म्हणाली, 'मी अभ्यास करणार आहे.'

(C) गीता म्हणाली 'मी अभ्यास करणार आहे.'

(D) गीता म्हणाली, "मी अभ्यास करणार आहे."

25) पुढीलपैकी कोणता शब्द जोडशब्द नाही ?

(A) धरपकड (B) धूळधाण (C) मुलेपोरे (D) फाटाफूट

26) सन 2022-23 चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार कोणाला देण्यात आला ?

(A) बाबासाहेब पुरंदरे (B) अविनाश धर्माधिकारी

(C) आप्पासाहेब धर्माधिकारी (D) आप्पासाहेब कुलकर्णी

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner

27) 2023 सालची महाराष्ट्र केसरी स्पर्धा कोणी जिंकली ?

(A) शिवराज राक्षे (B) पृथ्वीराज पाटील (कोल्हापूर)

(C) हर्षवर्धन सदगीर (D) बाला रफीक शेख

28) ग्रामपंचायतीची सदस्य संख्या किती असते ?

(A) 5 ते 15 (B) 7 ते 15 (C) 7 ते 17 (D) 9 ते 17

29) गावामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य कोण करतो ?

(A) तलाठी (B) ग्रामसेवक (C) पोलीस पाटील (D) कोतवाल

30) महाराष्ट्रातील कोणत्या नदीला दक्षिण भारताची गंगा / 'वृध्दगंगा' म्हणतात ?

(A) गोदावरी (B) तापी (C) कृष्णा (D) नर्मदा

31) खालीलपैकी कोणती नदी पश्चिम वाहिनी आहे ?

(A) कावेरी (B) गोदावरी (C) नर्मदा (D) मांजरा

32) पृथ्वी स्वतःभोवती फिरते या क्रियेला काय म्हणतात ?

(A) परिवलन (B) परिभ्रमण (C) पिंगा (D) रिंगन

33) भारताचे पहिले उपराष्ट्रपती कोण होते ?

(A) डॉ. राजेंद्र प्रसाद (B) डॉ. एस. राधाकृष्णन

(C) मौलाना आझाद (D) लाल बहादूर शास्त्री

34) भारताचा प्रथम नागरिक कोण असतो ?

(A) पंतप्रधान (B) राज्यपाल (C) राष्ट्रपती (D) मुख्यमंत्री

35) 'साठ लक्ष, साठ हजार, एकोणसत्तर' ही संख्या आंतरराष्ट्रीय संख्याचिन्हांत कशी लिहाल ?

(A) 60600069 (B) 6060069 (C) 6006069 (D) 6060079

36) 31 ते 40 मधील सम संख्यांची बेरीज किती?

(A) 140 (B) 144 (C) 190 (D) 180

37) पूरग्रस्त निधी उभारण्यास प्रत्येक विद्यार्थ्यामागे 675 रु. जमा केल्यास 814 विद्यार्थ्यांकडून एकूण किती रुपये जमा झाले ?

(A) 622710 रु. (B) 550450 रु. (C) 549450 रु. (D) 548450 रु.

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner

38) पुढीलपैकी कोणत्या संख्येला 3 न व 5 ने नि:शेष भाग जातो ?

(A) 913415 (B) 563210 (C) 825340 (D) 701325

39) 'पावणे सात आणि पावणे चार' यांची बेरीज किती?

(A) 10.5 (B) 9.75 (C) 11.25 (D) 10.25

40) 1 जानेवारी 2010 ला शुक्रवार होता, तर 2010 चा प्रजासत्ताक दिन कोणत्या वाराला येईल?

(A) सोमवार (B) बुधवार (C) मंगळवार (D) गुरुवार

41) स्मिताकडे 100 रुपयांच्या 7 नोटा, 50 रुपयांच्या 13 नोटा, 20 रुपयांच्या 25 नोटा व 5 रुपयांच्या 17 नोटा होत्या, तर स्मिताकडे एकूण किती रक्कम होती ?

(A) 1845 रु. (B) 1935 रु. (C) 1835 रु. (D) 1945 रु.

42) खालील संख्यामालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ?

7, 21, 35, 49, ?

(A) 56 (B) 77 (C) 63 (D) 84

43) खालील संख्यामालिकेतील चुकीचे पद ओळखा.

9, 16, 25, 35, 49

(A) 16 (B) 9 (C) 35 (D) 49

44) खालील अंकमालिकेचे निरीक्षण करुन गटात न बसणारे शब्द ओळखा

ABCDE FGHIJ KLMNO PQRST UVWXY

(A) LMN (B) HJK (C) QRS (D) TUV

45) दीपा स्वातीच्या उजवीकडे बसली. प्रज्ञा स्वातीच्या डावीकडे बसली, दीपा व सीता यांच्यामध्ये गीता बसली तर.........

मधोमध कोण बसली आहे.

(A) स्वाती (B) गीता (C) सीता (D) दीपा

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner

46) संकेत पूर्वेला तोंड करुन उभा आहे. तो दोन वेळा डावीकडे काटकोनात वळला आणि काही अंतर चालून गेला. नंतर उजवीकडे एक काटकोनात वळला, तर त्याचे तोंड कोणत्या दिशेला असेल ?

(A) पूर्व (B) पश्चिम (C) दक्षिण (D) उत्तर

47) सचिन व सौरभ यांच्या वयाची बेरीज 19 वर्ष आहे. सौरभ सचिनपेक्षा 3 वर्षांनी लहान आहे तर सचिनचे वय किती ?

(A) 8 वर्ष (B) 9 वर्ष (C) 11 वर्ष (D) 12 वर्ष

48) 'अ' ही 'ब' ची मुलगी आहे. 'क' ही 'अ' ची आत्या आहे. 'ड' हा 'क' चा एकुलता एक भाऊ आहे. तर 'क' ही 'ब' ची कोण ?

(A) नणंद (B) बहीण (C) जाऊ (D) भावजय

49) दुपारी 12 वाजल्यापासून त्याच दिवशी सायंकाळी 6 वाजेपर्यंत मिनिट काटा व तास काटा यांच्यात किती वेळा काटकोन होईल ?

(A) 10 (B) 11 (C) 12 (D) 6

50) डॉक्टरला वकील म्हटले, वकिलाला शिक्षक म्हटले, शिक्षकाला अभियंता म्हटले व अभियंत्याला डॉक्टर म्हटले तर रोग्यांना कोण तपासेल ?

(A) डॉक्टर (B) अभियंता (C) शिक्षक (D) वकील

www.NaukriVarta.in



Scanned with OKEN Scanner